20

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** विश्राम बाग
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0123  **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/04/2025 23:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार  **Date From (दिनांक पासून):** 24/04/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/04/2025
**Time From (वेळेपासून):** 12:12 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/04/2025  **Time (वेळ):** 23:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 034
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/04/2025 23:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक,लोकसेवक यांचे कक्षामध्ये, जिल्हा कषी विभाग सांगली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रविण शिवाजी पाटील

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1994

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिवप्रभू शाळेजवळ, कडेगाव, ,सांगली,कडेगाव,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | शिवप्रभू शाळेजवळ, कडेगाव, ,सांगली,कडेगाव,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9011959650

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष रंजना राजाराम चौधरी | | | 1. गणेशनमन अप,फ्लट नं404, धामणी रोड,सांगली,विश्राम बाग, सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | तीस हजार रुपये त्यामध्ये 500 | 30,000.00 |



Scanned with OKEN Scanner

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| | | | रुपये दराच्या 60चलणी नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

30,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 24.04.2025

मी श्री. प्रविण शिवाजी पाटील, वय- 31 वर्षे, शिक्षण - बी.फार्मसी, व्यवसाय:- व्यापार (कृषी औषध कंपनी), रा. शिवप्रभू शाळेजवळ, कडेगाव, ता.कडेगाव जि.सांगली मो.नं. 9011959650.

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियासह राहणेस आहे. मी कडेगाव एमआयडीसी येथील प्लॉट नं. बी - 84, शिवाजीनगर येथे शेती औषधांची कंपनी सुरू करणेकामी सन 2023 साली एमआयडीसी कार्यालय सांगली सोबत करार केला आहे.

त्यानंतर सदर जागेवर मी पॅरागॉन अग्री केअर या नावाची शेती औषध कंपनी स्थापन केली असून त्याचे बांधकाम पुर्ण करून बिल्डींग कम्प्लींशन सर्टिफिकेट दि.16.07.2024 रोजी एमआयआयडीसी ऑफीस येथून प्राप्त केले आहे. त्यानंतर सदर जागेवर पॅरागॉन अग्री केअर या नावाची शेती औषध कंपनी स्थापन करणेकामी डिलर रजिष्ट्रेशन सर्टिफिकेट (डी.आर.सी.) मिळणेकामी मी खाजगी एजंट श्री. गुरव यांचे मार्फत दि.22.04.2025 रोजी फाईल तयार करून घेतली होती.

त्यानंतर सदरची फाईल ऑनलाईनव्दारे कृषी आयुक्त कार्यालय पुणे येथे पाठवावी लागते. तत्पुर्वी कंपनीचे डिलर रजिष्ट्रेशन सर्टिफिकेट (डी.आर.सी.) मिळणेकामी लागणारे इन्स्पेक्शन रिपोर्ट हा जिल्हा कृषी कार्यालय, सांगली येथून प्राप्त करावा लागतो.

त्याकरीता मी दि. 23.04.2025 रोजी 11.30 वा चे सुमारास आमचे पॅरागॉन अॅग्री केअर या शेती औषध कंपनी स्थापन करणेकामी लागणारा कंपनीचा इन्स्पेक्शन रिपोर्ट मिळणेकामी जिल्हा कृषी कार्यालय येथे गेलो. तेथे माझी श्री.चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक यांची भेट झाली. त्यावेळी श्री. चौधरी साहेब यांनी मला कंपनीचे प्रत्यक्षात इन्स्पेक्शन न करता जागीच रिपोर्ट देणेसाठी माझेकडे 35,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी चौधरी साहेब यांना माझ्याकडे ऐवढे पैसे नसल्याचे सांगितले होते. त्यावेळी चौधरी साहेब यांनी मला भविष्यात त्रास नको असेल तर पैसे द्यावेच लागतील असे सांगितले. तसेच मी चौधरी साहेब यांना माझी फाईल इनवर्ड करून घेण्याची विनंती केली असता त्यांनी फाईल इनवर्ड करण्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले.

मी जर चौधरी साहेब यांना पैसे दिले नाहीतर ते आमचे कंपनीचे इन्स्पेक्शन रिपोर्ट देणार नाहीत तसेच भविष्यात देखील मला ते त्रास देतील याची मला खात्री आहे.

मला श्री. चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी कार्यालय सांगली यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. 23.04.2025 रोजी सकाळी 12.30 वा चे सुमारास पोलीस उपअधीक्षक श्री. उमेश पाटील, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांची अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे जावून भेट घेवून त्यांना माझी श्री. चौधरी साहेब यांचेविरूध्द लाच मागणीबाबतची तक्रार सांगितली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला सांगली येथील सांगली मिरज रोडलगत असले हिरो शोरूम मिरजचे पाठामागील जाणारे रोडलगत येथे 15.00 वा हजर राहणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथून माझेकडील हुंडाई क्रेटा कार क्र. MH -10 -EE -6164 मधून रवाना झालो. त्यानंतर मी काही वेळाने सांगली येथे माझे काम संपवून सांगली मिरज रोड येथील हिरो शोरूम मिरजचे पाठामागील जाणारे रोडलगत 14.45 वाजता दाखल झालो. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.



Scanned with OKEN Scanner

पाटील साहेब हे पथकासह त्यांचेकडील खाजगी कारने 15.00 वा चे सुमारास हिरो शोरूम मिरजचे पाठामागील जाणारे रोडलगत दाखल झाले. त्यावेळी मी पाटील साहेब यांची जावून भेट घेवून त्यांचेकडील कारमध्ये बसलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती दिली. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचेनप्रमाणे दोन शासकीय पंच आम्ही थांबलो तिकाणी पाटील साहेब यांचे समक्ष हजर झाले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार पोना/चौगुले, पोह/वडणीकर व पोकॉ/पाटील यांची ओळख करुन दिली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला लाच मागणीचा तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा श्री. चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी कार्यालय सांगली यांचेविरुध्दचा लाच मागणीचा तक्रारी अर्ज समक्ष हजर केला. मी दिले तक्रारी अर्जावर पाटील साहेब यांनी वाचून सही केली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून श्री. शार्दुल रघुनाथ जाधव यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. खेमराज फकीराजे पडवे यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचा समक्ष कथन केली व माझा तक्रारी अर्ज वाचण्यास दिला. पंचांनी तक्रारी अर्ज वाचून मी सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याचे खात्री झालेनंतर तक्रारी अर्जावर सहया केल्या.

त्यानंतर मी आमचे पॅरागॉन ॲग्रो केअर कंपनीची फाईल पाटील साहेब यांचे समक्ष हजर केली. त्यामध्ये कंपनीचे रजिष्ट्रेशन सर्टिफिकेट, अपॉइंटमेट लेटर, न भरलेला इन्स्पेक्शन रिपोर्ट, ॲग्रीमेंट वगैरे कागदपत्रे होती. त्यावेळी मी पाटील साहेब यांना फाईल मधील इन्स्पेक्शन रिपोर्टवरती श्री. चौधरी साहेब हे त्यांचे सही शिक्का देवून इन्स्पेक्शन रिपोर्ट देणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 जाधव यांना श्री. चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक यांचेकडे जिल्हा कृषी कार्यालय सांगली येथे पाठवून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 जाधव यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यानंतर पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.49 वा सुरू करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 शार्दुल जाधव असे माझेकडील हुंडाई क्रेटा कार MH 10 EE 6164 मधून रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय, सांगली येथे दाखल झालो. त्यानंतर मी कार पार्क करून मी व पंच नं.1 जाधव असे पायी चालत कार्यालयात जावून जिल्हा कृषी कार्यालय येथे दाखल झालो. त्यावेळी श्री.चौधरी साहेब हे कार्यालयामधील क्लार्क बसले टेबलच्या ठिकाणी बसले होते. त्यावेळी त्यांनी मला थोडा वेळ बसण्यास सांगितले. त्यावेळी मी व पंच नं.1 जाधव असे कार्यालयात असले खुर्चीवर बसून राहिलो. त्यानंतर काही वेळाने चौधरी साहेब हे कार्यालयातून बाहेर जावून काही वेळाने पुन्हा कार्यालयात माझेजवळ येवून माझे खांदयावर हात टाकून मला त्यांचे केबीनमध्ये घेवून गेले. पंच नं.1 जाधव हे देखील आमचे पाठोपाठ आले. त्यावेळी मी व चौधरी साहेब यांना माझे कंपनीचे फाईल दाखवून त्यामध्ये कंपनीची बिल्डींग कम्प्लींशन सर्टिकिकेड, प्लॉट करार, वगैरे. कागदपत्रे दाखवून आम्हा दोघांमध्ये इन्स्पेक्शन रिपोर्ट संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी चौधरी साहेब यांनी मला "एमआयडीसी येथील प्लॉट बाबत विचारणा केली असता मी त्यांना 99 वर्षाचे ॲग्रीमेंट केले असल्याचे सांगितले. त्यानंतर चौधरी साहेब यांनी मला "इन्स्पेशन करून घ्यायला लागणार, बरोबर हाय आपल्याला नेक्स्ट इन्स्पेक्शनचे थोडस चार्जेस, आता सांगीतले का गुरव साहेबांनी तुम्हाला ?" असे विचारले. त्यावर मी त्यांना "नाही काय ...... ते म्हणले साहेबांना बोलुन घ्या म्हणले" असे म्हणालो. त्यावर चौधरी साहेब यांनी मला "आता इन्स्पेक्शनचे प्रोसेस अशी हाय की तिथ जाऊन फोटो काढणे... डॉक्युमेंट घेणे ...... डॉक्युमेंट टाकलेत ना यात ?" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना डॉक्युमेंट टाकले असल्याचे सांगितले. त्यावेळी चौधरी साहेब यांनी मला "आता कस करतोय, आपण एका इन्स्पेक्टरच पंचवीस आणी दहा अशी फि आहे दोघांची फि.. थर्टी फाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "किती पस्तीस हजार?" असे म्हणालो असता चौधरी साहेब यांनी "हा.. हयाच्या इन्स्पेक्शनची" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "सर कमी न्हाय होणार.......? एवढ आता नविनच चालु कराय लागलोय" असे म्हणालो. त्यावर चौधरी साहेब यांनी मला "असुदे करा की पुढ कस असतय तुम्हाला मग बाकीचा त्रास काय देत न्हाय इन्स्पेक्शन हा महत्वाचा ॲटम असतोय तुम्ही असल्यामुळे आम्ही ठिक हाय थोड इकड तिकड करा पंचवीस आणी पाच तीस पर्यंत करा" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "तीस हजार ?" असे म्हणालो असता त्यांनी "मी तुम्हाला इन्स्पेक्शन रिपोर्ट आज उदया देवुन टाकतो" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "चालतय मग इन्स्पेक्शन हिथच देणार का?" असे विचारले असता चौधरी साहेब यांनी "न्हाय तिथ येवुन करायच असतय ...... तुमच तर गुरवन मला सांगीतलय विचारल त्यांना चांगली माणस हाय काय विषय न्हाय त्यांना माहित हाय त्यांना विचारून घ्या..... नविन आलेल कणी पुढच्या गोष्टी त्रास देत न्हाय सहकार्य होतय" असे म्हणून रिपोर्टवर दुस-या अधिका-यांचे सही देखील ते घेत असल्याचे सांगितले.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर चौधरी साहेब यांनी मला उद्या सकाळी दहा-साडेदहा वाजता ऑफीसला येण्यास सांगून येताना फाईलची झेरॉक्स कॉपी, त्यांचे नावचा लेटर हेडवरील अर्ज वगैरे कागदपत्रे आणण्यास सांगितली. त्यानंतर चौधरी साहेब यांना मला त्यांचा मोबाईल क्रमांक दिल्याने मी त्यांचे मोबाईलवर मिस कॉल दिला. त्यानंतर मी चौधरी साहेब यांना "येवू साहेब ?" असे म्हणून तेथून मी व पंच नं.1 जाधव असे कार्यालयाचे बाहेर येवून पार्किंगमध्ये असले कारमधून रवाना होवून पाटील साहेब यांचेसमक्ष हजर झालो. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 17.19 वाजता काढून घेवून बंद केला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच नं.1 शार्दुल जाधव यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली. माझे व चौधरी साहेब यांचेतील बोलणे पंच नं.1 शार्दुल जाधव यांनी देखील ऐकले आहे.

मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने पाटील साहेबांनी श्री. चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी कार्यालय सांगली यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, श्री. चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी कार्यालय सांगली यांनी आमचे पॅरागॉन ॲग्रो केअर या कंपनीचे प्रत्यक्षात इन्स्पेक्शन न करता कार्यालयातच इन्स्पेक्शन रिपोर्ट देणेकरीता माझ्याकडे स्वत:करीता 35,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 30,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम दि.24.04.2025 रोजी सकाळी घेवून येण्यास सांगून आलेनंतर फोन करण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सदर ठिकाणी पंचनामा करणे गैरसाईचे असल्याने मी, पाटील साहेब व सापळा पथक व पंच असे हिरो शोरूम मिरज येथून आमचेकडील वाहनाने रवाना होवून अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय सांगली येथे दाखल होवून पाटील साहेब यांनी पुढील कारवाई एसीबी कार्यालयात पुर्ण केली. त्यानंतर पाटील साहेबांनी श्री. चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक यांचेविरुध्द दि.24.04.2025 रोजी सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करून मला दि.24.04.2025 रोजी सकाळी 10.00 वाजता सांगली मिरज रोड येथील हिरो शोरूम मिरजचे पाठीमागील जाणारे रोडलगत लाच म्हणुन दयाव्या लागणा-या 30,000/- रूपये रकमेसह हजर राहण्याच्या व झाले कारवाईबाबत गोपनीयता राखणेच्या सुचना देवून जाणेस सांगितले त्याप्रमाणे मी निघून गेलो.

दि.24.04.2025 रोजी मी सकाळी 10.30 वा चे सुमारास सांगली मिरज रोड येथील हिरो शोरूम मिरजचे पाठीमागील जाणारे रोड येथे जावून पाटील साहेब व सापळा पथक यांची भेट घेतली. त्यानंतर पाटील साहेबांनी श्री. चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी कार्यालय सांगली यांचेविरूध्द मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय, सांगली येथील जिल्हा कृषी कार्यालय, सांगली येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला श्री. चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक यांनी मागितल्याप्रमाणे त्यांना द्यावी लागणारी लाच रक्कम 30,000/- रूपये हजर करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी 500/- रूपये दराच्या 60 नोटा असे 30,000/- रूपये पाटील साहेब व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. त्यावेळी पाटील साहेब यांनी सापळा पथकातील कर्मचारी यांचेकरवी लाच रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेवून सदर कागदावर पाटील साहेब, दोन्ही पंच व मी सही केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी हजर केलेल्या नोटाना पथकातील अंमलदार बडणीकर यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन 30,000 /- रूपयांचा नोटांचा बंडल माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवला. व पाटील साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. पाटील साहेब यांनी पथकातील अंमलदार बडणीकर यांना हिरो शोरूम मिरज येथे रोडलगत जागीच थांबणेच्या सुचना देवून त्यांना सापळा कारवाईमधून वगळण्यात आलेचे सांगितले.

त्यावेळी माझे मोबाईलवर श्री. चौधरी साहेब यांचे मो.क्र. 8999261766 वरून 11.14 वा दोन वेळा मिस कॉल येवून गेला असल्याचे मी पाटील साहेब यांना सांगितले. त्यानंतर पाटील साहेब यांनी माझे मोबाईलवरून चौधरी साहेब यांना फोन करून सापळापुर्व पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझे मो.क्र. 9011959650 वरून श्री. चौधरी साहेब यांना 11.15 वा कॉल करून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी मी चौधरी साहेब यांना विश्रामबागला आलो असल्याचे सांगून मोर्चा असल्याने ट्रॅफीकमध्ये अडकलो असल्याचे कुठे येवू दे? अशी विचारणा केली असता चौधरी साहेब यांनी मला बाहेर आलेनंतर फोन करण्यास सांगितले. सदरचा कॉल पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केला आहे.

त्यानंतर पाटील साहेबांनी श्री. चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी कार्यालय सांगली यांचेविरूध्द मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय, सांगली येथील जिल्हा कृषी कार्यालय, सांगली येथे सापळा कारवाई



Scanned with OKEN Scanner

आयोजित करण्याचे निश्चित केले. व त्यानंतर पाटील साहेब यांनी मला, पंच नं.1 जाधव यांना व सापळा पथकास सापळा कारवाईबाबतच्या आवश्यक त्या सुचना दिल्या.

त्यानंतर पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.12 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळयामध्ये अडकवून माझे शर्टच्या आतमध्ये सोडला. त्यानंतर मी व पंच नं.1 जाधव असे माझेकडील हुंडाई क्रेटा कार क्र. म्क्ष 10 कक 6164 मधून हिरो शोरुम मिरजचे पाठीमागील रोड येथून रवाना झालो.

माझे पाठोपाठ पाटील साहेब व सापळा पथक हे त्यांचेकडील वाहनाने रवाना झाले. मी माझेकडील कारने विजयनगर चौक मार्गे मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय, सांगली येथे दाखल झालो. त्यावेळी मी माझे मोबाईल वरून चौधरी साहेब यांचे मोबाईलवर फोन करून त्यांना ऑफिसचे पार्किंगमध्ये आलो असल्याचे सांगितले. त्यावर चौधरी साहेब यांनी मला त्यांचे ऑफीसला येण्यास सांगितल्याने मी व पंच नं.1 असे पार्किंगमधून पायी चालत श्री.चौधरी साहेब यांचे कार्यालयात जावून त्यांची भेट घेतली. त्यावेळी चौधरी साहेब यांनी मला थोडा वेळ बसण्यास सांगितले. त्यानंतर चौधरी साहेब यांनी मला त्यांचे कारची चावी देवून कॅन्टीनजवळील त्यांचे कारमधून त्यांची बॅग आणण्यास सांगितले. त्यानंतर मी चौधरी साहेब यांची कार्यालयाचे पार्किंगमध्ये असले हुंडाई औरा कार क्र. MH 42 BB 6460 मधून त्यांची चॉकलेटी रंगाची लेदर बॅग घेवून परत चौधरी साहेब यांचे केबीनमध्ये आलो. त्यावेळी चौधरी साहेब यांनी मला फाईलची झेरॉक्स आणली आहे का? असे विचारले असता मी त्यांना फाईलची झेरॉक्स आणली असल्याचे सांगून सदरची झेरॉक्स फाईल त्यांना देवून सोबत अर्ज देखील आणला असल्याचे सांगितले. त्यावेळी चौधरी साहेब यांनी मी आणून दिले त्यांचे चॉकलेटी रंगाची लेदर बॅगमधून इन्स्पेक्शन रिपोर्ट बाहेर काढून त्यावर त्यांनी सही करून शिक्का मारला. व त्यांनी मी दिले अर्जावर "इन्स्पेक्शन रिपोर्ट रिसीव्हड" असा शेरा मारून सही करण्यास मला सांगितली असता मी दिले अर्जावर सही करून "इन्स्पेक्शन रिपोर्ट रिसीव्हड" असा शेरा मारला. त्यावेळी चौधरी साहेब यांनी मला इन्स्पेक्शन रिपोर्टची झेरॉक्स काढण्यास सांगून झेरॉक्स फाईलला लावण्यास सांगितली. त्यावेळी मी कार्यालयाचे बाहेरील मेन रोडचे पलीकडील असले झेरॉक्स सेंटर येथे जावून इन्स्पेक्शन रिपोर्टची झेरॉक्स काढून घेवून पुन्हा चौधरी साहेब यांचे केबीनमध्ये येवून त्यांना झेरॉक्स प्रत देवून ओरीजनल प्रत कोठे लावू? अशी विचारणी केली असता चौधरी साहेब यांनी ओरीजनल प्रत ऑनलाईनला अपलोड करण्यास सांगून मुळ फाईलला प्रत लावण्यास सांगितली. त्यानंतर चौधरी साहेब यांनी मला डॉक्युमेंट सगळे लावले आहेत का अशी विचारणी केली असता मी सगळे डॉक्युमेंट लावले असल्याचे सांगितले. त्यावर चौधरी साहेब यांनी मला मी दिले अर्जावर तारीख टाकण्यास सांगितली असता मी त्यांना तुम्ही मला काल अर्जावर तारीख टाकू नको असे म्हणल्याने मी अर्जावर तारीख टाकली नसल्याचे सांगितले. त्यावेळी चौधरी साहेब यांनी मला अर्जावर तारीख टाकण्यास सांगितले असता मी अर्जावर 22.04.2025 तारीख टाकून झेरॉक्स फाईल त्यांना दिली. त्यावेळी चौधरी साहेब यांनी हाताने इशारा करून पैशाची मागणी केल्याने मी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये अॅन्थ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम 30,000/- रूपये माझे उजवे हाताने बाहेर काढून श्री.चौधरी साहेब यांचे समोर धरून "तीस हजार हायती....मोजून घ्या" असे म्हणालो असता चौधरी साहेब यांनी लाच रक्कम त्यांचे डाव्या हाताने स्विकारून त्यांचे पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली. त्यावेळी मी चौधरी साहेब यांना आता पुढे सहकार्य ठेवा असे म्हणालो. त्यावर चौधरी साहेब यांनी मला फाईल ऑनलाईन पुणे ऑफीसला पाठवणेस सांगितली. त्यानंतर मी त्यांना "येवू" असे म्हणून मी चौधरी साहेब यांचे केबीनमधून बाहेर येवून कार्यालयाचे मोकळया पॅसेजमध्ये येवून हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच सापळा पथकातील कर्मचारी पोकॉ/पाटील हे माझेजवळ येवून त्यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 13.09 वाजता काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला थांबण्यास सांगितले. त्यानंतर सदर ठिकाणी उपस्थित असले पंच नं-1 श्री.जाधव यांनी लोकसेवक श्री.चौधरी यांचेकडे बोट करुन ते लोकसेवक चौधरी असल्याचे सांगितले व त्यांनी लाच रक्कम स्विकारुन त्यांचे पॅन्टचे डावे बाजुचे खिशात ठेवली असल्याचे सांगितले असता पाटील साहेब व सापळा पथकाने यांनी श्री. चौधरी साहेब यांना ताब्यात घेतले. तसेच त्यांचेकडील 30,000 /- रूपये लाच रक्कम पंचासमक्ष ताब्यात घेतली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या पुर्ण केल्या व सदर ठिकाणी पंचनामा करणेच गैरसोईचे असलेने पुढील सविस्तर सापळापूर्व, सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, सांगली येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 23.04.2025 रोजीचे 15.49 वा. ते 17.19 वा. च्या पडताळणी कारवाई दरम्यान पंचासमक्ष लोकसेवक श्री. संतोष रंजना राजाराम चौधरी, वय-46 वर्षे, व्यवसाय - नोकरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृष्णी विभाग सांगली, वर्ग-2 यांनी त्यांचे कक्षामध्ये आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने आमचे पॅरागॉन अॅग्रो केअर कंपनीचे प्रत्यक्षात इन्स्पेक्शन न करता कार्यालयातच इन्स्पेक्शन रिपोर्ट देणेकरीता



Scanned with OKEN Scanner

माझ्याकडे स्वत: करीता 35,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 30,000/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम दि. 24.04.2025 रोजीचे 12.12 वा ते 13.09 वा चे सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. संतोष रंजना राजाराम चौधरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, वर्ग-2 यांनी त्यांचे जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी विभाग सांगली येथील कक्षामध्ये पंचांसमक्ष माझ्याकडून आमचे पॅरागॉन अ्ग्रो केअर कंपनीचे इन्स्पेक्शन रिपोर्ट दिलेचे मोबदल्यात माझ्याकडून 30,000/- रूपये लाच रक्कम स्विकारली आहे. म्हणून माझी लोकसेवक श्री. संतोष रंजना राजाराम चौधरी, वय-46 वर्षे, व्यवसाय - नोकरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा कृषी विभाग सांगली, वर्ग-2, सध्या रा.गणेशनमन अपार्टमेंट, फ्लॅट नं.404, धामणी रोड सांगली, ता.मिरज जि.सांगली. मुळ रा. गलांडेवाडी नं.1, ता.इंदापूर, जि.पुणे यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब, ?

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
chetan nathuram mane
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): DGPCNMM8901
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SUDHIR GULCHAND
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PSMN26817

पोलीस स्टेशन ऑफिसर,
विश्रामबाग पोलीस स्टेशन, सांगली



Scanned with OKEN Scanner